# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## चालू वर्षाअखेरीस १.५० लाखांपर्यंत प्रवासी सेवा नेण्याचे उद्दिष्ट : श्री. हर्डीकर

## मेट्रो भवन येथे ७७ व्या प्रजासत्ताक दिन संपन्न



नागपूर : महा मेट्रो सकारात्मक दृष्टीकोनाने कार्यरत असून महाराष्ट्रातील सर्वोत्तम व अग्रगण्य संस्थांपैकी एक होण्याचे उद्दिष्ट ठेवून पुढे जात आहे. नागपूर मेट्रोचा फेज–१ पूर्णतः कार्यान्वित झाला असून एकुण ४० किमी मार्गावर प्रवासी सेवा सुरू आहे. प्रवासी सेवा सुरू असलेल्या नागपूर मेट्रो फेज–१ ने एक लाख प्रवासीसंख्येचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून, चालू वर्षाअखेरीस ही संख्या १.५० लाखांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट महा मेट्रोने निश्चित केले आहे असे प्रतिपादन महा मेट्रोचे

व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांनी केले. मेट्रो भवन येथे आयोजित ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. तसेच नागपूर मेट्रो फ़ेज - २ ४४ किमी मार्गाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. २०२७–२०२८ पर्यंत संपूर्ण नागपूर मेट्रो प्रकल्प कार्यान्वित करण्याचा आमचा निर्धार आहे असे त्यांनी यावेळी नमूद केले.



पुणे मेट्रोबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, भारत सरकारकडून पुणे मेट्रोच्या विस्तार प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. पुणे मेट्रोचे उत्तर–दक्षिण आणि पूर्व–पश्चिम असे दोन विस्तार प्रकल्प मंजूर झाले असून, त्यांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. याशिवाय, पुणे मेट्रोच्या फेज–२ ला देखील यावर्षी भारत सरकारकडून मंजुरी प्राप्त झाली आहे. लाइन ४ आणि ४ए (खडकवासला ते हडपसर, पुढे खराडीपर्यंत) तसेच माणिकबाग ते नळस्टॉप या स्पर लाईनचे काम सुरू करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. पुढील विस्तार टप्प्यात पुणे मेट्रो सुमारे ५० किमीहून अधिक मार्गांवर कार्यरत राहणार आहे.

नागपूर मेट्रोच्या टीमने ठाणे मेट्रो प्रकल्पालाही सुरुवात केली असून, ठाणे इंटिग्रल मेट्रो रेल प्रकल्पाची एकूण लांबी २९ किमी आहे. या प्रसंगी, भारताचे माननीय पंतप्रधान, महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री, आमचे अध्यक्ष व सचिव यांच्या नेतृत्वाखालील गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाची संपूर्ण टीम, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग–१ व विभाग–२ मधील अधिकारी, संचालक मंडळ तसेच नागपूर, पुणे, ठाणे व नवी मुंबई येथील सर्व नागरिकांचे श्री. हर्डीकर यांनी मनःपूर्वक आभार मानले. नागरिकांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच हे सर्व प्रकल्प वेळेत आणि यशस्वीरीत्या राबविणे शक्य होत असल्याचे त्यांनी नमूद केले..


माझी मेट्रो
माझी मेट्रो
NAGPUR METRO
Committed to provide,
to the Citizens of Nagpur,
• SAFE
• WORLD CLASS